# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ

जा.क्र.सनिमा/वि-१/कलम ७३ क अ(४)/आदेश/२०१७
दिनांक : २४.१०.२०१७

संदर्भ : १) या कार्यालयाचे जा.क्र.सनिमा/वि-१/रोखिग्राबिशेपत/नोटीस/२०१७, दि.०३.१०.२०१७

ज्याअर्थी, रोझरी खिश्चन ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण, नोंदणी क्रमांक एसडीजी/एमएलएन/आरएसआर/(सीआर)/७५६/सन १९९६, दि.०८.०७.१९९६ या संस्थेचे समिती सदस्य श्री.नरोन्हा जॉन घाब्रियल हे उक्त संस्थेच्या सलग तीन पेक्षा अधिक संचालक मंडळ सभेस गैरहजर राहीलेले असल्याने संस्था पोटनियम क्रमांक (४४)(११) प्रमाणे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कअ प्रमाणे समिती सदस्यासाठी अपात्र ठरत आहेत. त्यामुळे, त्यांचे उक्त संस्थेचे समिती सदस्यत्व बंद झाले असल्या बाबतचे आदेश का निर्गमीत करण्यात येऊ नये ? अशी नोटीस संदर्भिय क्रमांक १ ने दिलेली असून दि.२३.१०.२०१७ पर्यंत लेखी म्हणणे किंवा समक्ष उपस्थित राहून म्हणणे सादर करणेकामी सुचित करण्यात आलेले होते. संबधित इसम यांनी उक्त दिनांका पर्यंत लेखी म्हणणे सादर केलेले नाही व सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत.

ज्याअर्थी, सदर प्रकरणी संस्थेच्या दप्तरातील नोंदी वरुन माहिती घेतली असता श्री.नऱ्होना जॉन घाब्रीयल हे संस्थेच्या संचालक मंडळ सभा दि.१७.०४.२०१६, २२.०५.२०१६, १९.०६.२०१६, १७.०७.२०१६, २१.०८.२०१६, १०.०९.२०१६, २३.०९.२०१६, ०७.१०.२०१६, १९.११.२०१६, १७.१२.२०१६, २०.०१.२०१७, १९.०२.२०१७, १९.०३.२०१७, १६.०४.२०१७, २१.०५.२०१७, १८.०६.२०१७, २३.०७.२०१७, २०.०८.२०१७, १७.०९.२०१७, अशा सलग १९ सभांना गैरहजर आहेत.

त्याअर्थी, उक्त संस्थेचे समिती सदस्य, श्री.नरोन्हा जॉन घाब्रियल हे संस्था पोटनियम क्रमांक ४४ (११) प्रमाणे संस्थेच्या सलग तीन पेक्षा अधिक सभांना गैरहजर असल्याने समिती सदस्य म्हणून अपात्र ठरतात याची खात्री झाली असून पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आदेश

मी कृ.रा.धुळप, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालवण या आदेशान्वये , रोझरी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण या संस्थेचे समिती सदस्य श्री. नरोन्हा जॉन घाब्रियल हे संस्था पोटनियम क्र. ४४ (११) प्रमाणे समिती सदस्य म्हणून अपात्र ठरत असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ १ (चार) प्रमाणे त्यांचे उक्त संस्थेचे समिती सदस्यत्व बंद झाले आहे, असे आदेश निर्गमीत करण्यात येत आहेत.

हा आदेश माझी स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रा नोंद करुन आज दिनांक २४.१०.२०१७ रोजी निर्गमीत करण्यात आला.

(कृ.रा.धुळप)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, मालवण

प्रती,
श्री. नरोन्हा जॉन घाब्रियल

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
सचिव, रोझरी खिश्चन ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण